प्रेस नोट

जळगांव शहर पो.स्टे.
दि.०९/०४/२०२५

प्रति.

मा.संपादक सो.

दैनिक -------------

विषय - **जळगांव शहर पोलीस गुन्हे शोध पथकाची उल्लेखनीय कामगीरी जबरी चोरी करणारे अट्टल चोरटे १२ तासाच्या आत जेरबंद**

दि.०८/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० जळगांव शहरातील शिवाजी नगर उड्डाण पुल ते सुरत रेल्वे गेट असा रिक्षाने प्रवास करणारे प्रवाशी नामे रविंद्र बाबुलाल लुले वय-४७ रा. राजमालती नगर जळगांव यांना बौध्द विहाराजवळ गेंदालाल मिल या ठिकाणी सह प्रवासी म्हणुन बसेलेले रिक्षा प्रवाशी नाव गांव माहीत नाही यांनी मारहाण करुन जबरीने १७,०००/- रुपये चोरी केले होते.

नमुद गुन्ह्याचे मिळालेल्या माहीती व आरोपीचे वर्णानानुसार चोरट्याचा मा.पोलीस अधीक्षक सो.श्री माहेश्वर रेड्डी सो. मा. अप्पर पोलीस अधीक्षक सो. अशोक नखाते मा.पोलीस अधीक्षक सो.श्री माहेश्वर रेड्डी सो. मा. अप्पर पोलीस अधीक्षक. अशोक नखाते सो उप विभागीय पोलीस अधिकारी श्री.संदिप गावीत सो. मा.पोलीस निरीक्षक अनिल भवारी यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे सपोनि रामचंद्र शिखरे, सफौ.सुनिल पाटील,पोहेकॉ/संतोष खवले पोहेकॉ.उमेश भांडारकर,पोहेकॉ/सतिश पाटील,पोहेकॉ भास्कर ठाकरे, ,पोहेकॉ किशोर निकुंभ पोहेकॉ योगेश पाटील,पोकॉ.अमोल ठाकुर ,पोकॉ.पांचाळ,पोकॉ.प्रणय पवार यांना तपासाबाबत योग्य त्या सुचना दिल्या व त्यानुसा गुन्हे शोध पथकाचे दोन पथक तयार करुन गुन्हे शोध पथकातील कर्मचारी यांनी गुप्त बातमीदारा मार्फत माहीती काढुन आरोपी १) वसीम तेली शेर अली तेली वय-३५ रा.गेंदालाल मिल जळगांव २) शेख अर्शद शेख हमीद उर्फ हर्षद अण्णा वय-२६ रा गेंदालाल मिल जळगांव यांना गुन्हयाचे वेळेस परिधान केलेल्या कपड्यासह पकडुन त्यांचे कडुन गेले माल पैकी १२,०००/ रोख रुपये हस्तगत केले आहे. व सदर गुन्हा हा १२ तासाच्या आत गुन्हा उघडकीस आणण्याची चांगली कामगिरी जळगांव शहर पोलीस स्टेशन येथील गुन्हे शोध पथकाने केली आहे.नमुद आरोपीपैकी वसीम तेली हा नुकताच येरवडा जेल येथुन सुटलेला आहे. सदर आरोपीतांविरुध्द जळगांव शहर पो.स्टे.येथे गुरनं १३५/२०२५ प्रमाणे दाखल असुन त्याची वर प्रमाणे उकल करण्यात यश आलेले आहे.